# पुरुष, स्त्रिया आणि यांची बायबलमधील समता:

## • बायबलप्रणित समानतावादी ख्रिस्ती विश्वासीजन •

मानवाची उत्पत्ति आणि तारण ह्या संदर्भात पुरुष व स्त्रिया दोघे समसमान आहेत अशी बायबलची शिकण आहे. ह्या संबंधी पुढील बायबल-वचने वाचावीत; कारण ती ह्या विधानांची साक्ष देतात:-

उत्पत्ति १:२६-२८, २:२३ व ५:१-२;

१ करिंथ. ११:११-१२;

गलती. ३:१३,२८ व ५:१

अधिकारपूर्ण असलेले देवाचे म्हणजे आपले बायबल. ते आपल्याला काय शिकवते ?- हेच की समग्र बायबलमधून, अगदी अथपासून इतिपर्यंत, स्वतःला, स्वतःच्या विचारांना प्रगट केलेले आहे. आणि हे पुढील बायबल-वचनांवरून स्पष्ट स्पष्ट दिसून येईल:-

मत्तय ५:१८; योहान १०:३५;

२ पेत्र १:२०-२१; २ तिमथी ३:१६.

बायबलच्या अर्थ लावताना तो पूर्णांशाने आणि विषयवारपणे लावण्यात आला पाहिजे असे आम्ही मानतो. दैवी प्रेरणा आणि अर्थ लावणे ह्या दोहोंमधील अंतर लक्षात घेण्याची कशी काय गरज आहे, हे देखील लक्षात घेतले पाहिजे, असा आमचा विश्वास आहे: प्रेरणा ही दैवी सूचनेशी आणि दैवी नियंत्रणाशी संबंधीत असून ह्याच निकषावर देवाचे समग्र वचन असे जे बायबल ते प्रमाणित/सर्वमान्य असे ठरविण्यात आलेले आहे.

ह्याउलट, अर्थ लावणे ही एक अशी (मानवी) प्रक्रिया/प्रयत्न आहे की जिच्यामुळे बायबलद्वारे प्रकट केल्या गेलेल्या सत्याचे, यामधील - सुसंगतीनुसार आणि पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनानुसार ते आपल्याला समजावे असा अर्थ लावण्यात यावा. ख्रिस्ती विश्वासियांनी आपला विश्वास आणि आचरण बायबलप्रमाणे ठरावे म्हणून बायबलच्या प्रखर प्रकाशात वारंवार तपासत राहिले पाहिजे.

→ ..... २

# बायबलमधील सत्ये

(१) पुरुष आणि स्त्री ह्या दोघांनाहि देवाने आपल्या प्रतिरूपाचे निर्माण केले. त्या दोघांचा नातेसंबंध थेट देवाशी होता, आणि दोघांनी जोडीने मुलांचे प्रजनन आणि संगोपन सहकार्याने आणि जबाबदारीने करावे, हे अपेक्षित होते. त्याशिवाय, समुद्रातील जलचर आकाशांतील पक्षी, ग्राम व वनपशु आणि अवघी पृथ्वी ह्यांवर त्यांनी सत्ता चालवावी असेहि देवाने त्यांना सांगितले होते. असे आपले बायबल शिकवते. [उत्पत्ती १:२६-२८].

(२) पूर्ण आणि समान अशी भागीदारी करण्यासाठी स्त्री व पुरुष हे दोघे देवाने निर्माण केले होते, असे बायबल आपल्याला शिकवते. शास्त्रपाठ उत्पत्ति २:१८ ह्या वचनातील [ezer] हा जो शब्द स्त्रीच्या संबंधात वापरलेला आहे, तोच शब्द पुनःपुन्हा जुना करार विभागात काही वचनांमध्ये खुद्द परमेश्वराच्या बाबतीतहि वापरण्यात आलेला आहे! उदा. १ शमुवेल ७:१२, स्तोत्र १२१:१-२; त्यावरून हे निश्चित दिसून येते की, स्त्रीच्या संदर्भात वापरलेला ह्याच शब्दावरून स्त्री ही पुरुषाच्या हाताखालची अगर त्याच्यापेक्षा कमी प्रतीची होती, असे मुळीच सूचित केलेले नाही!

(३) देवाने पुरुषाच्या शरीरापासून स्त्रीची निर्मिती केली, ह्यावरून स्त्री-पुरुषात एकता आणि समानता आहे, हेच बायबल आपल्याला दाखविते. उदा. उत्पत्ति २:२१-२३ ही वचने पाहावीत. उत्पत्ति २:१८,२० ह्या वचनांतील 'अनुरूप' [kenegdo] हा शब्द दोघेंमधील समानता व योग्यता ह्या दोन गोष्टींचा निर्देश करतो.

(४) पापांत पडण्याच्या प्रसंगात आदाम आणि हव्वा ही दोघेहि सहभागी होते असे बायबल शिकविते. ह्या कामात आदाम हा हव्वेपेक्षा कमी दोषी ठरत नव्हता. उदा. उत्पत्ति ३:६, रोम. ५:१२-२१ आणि १ करिंथ. १५:२१-२२ ही वचने वाचावीत.

(५) आदामाचे आपल्या स्त्रीवरील स्वामित्व त्या उभयतांच्या पतनाचा काय तो परिणाम होता. तेव्हा तो काही मूलतः निर्मितीचा भाग मुळीच नव्हता, असे बायबल आपल्याला शिकविते.

→ ....३

उत्पत्ति ३:१६ हे वचन आदाम-हव्वेच्या पतनाच्या-
दुष्परिणामांचे भाकीत वर्तविणारे असून तो काही परमेश्वराच्या
आदर्श व्यवस्थेसाठीचा उपाय नव्हता!

## तारण/उद्धार

(६) प्रभु येशू ख्रिस्त स्त्रीची तसेच पुरुषाची पापापासून सुटका
करण्याकरिता जगात आला, असे बायबल आपल्याला शिकवते.-
आपण सारेच ख्रिस्तामध्ये एक आणि त्याच्यावरील विश्वासाद्वारे
देवाच्या आशीर्वादाचे वारसदार ठरतो. अर्थात त्याचा संबंध
वांशिक, सामाजिक अथवा लिंगभेदाशी रतिभराहि येत नाही!
[संदर्भासाठी — योहान १:१२-१३; रोम० ८:१४-१७; २ करिंथ. ५:१७
आणि गलति० ३:२६-२८ ही वचने पहावीत.]

## समाज

(७) पेंटेकॉस्ट [पन्नासाव्या] दिवशी परमेश्वराचा पवित्र आत्मा पुरुष
आणि स्त्रिया ह्या दोहोंच्यावर सारखाच आला. कसलाहि भेदभाव न
करता पवित्र आत्मा जसा पुरुषात तसाच स्त्रियांमध्येहि वसतीस येऊन
राहतो; लिंगभेद न दाखविता तो एकाधीकाराने कृपादाने त्यांना देतो.
उदा० प्रेषित० २:१-२१; १ करिंथ. १२:७ व १४:३१ ही वचने पाहावीत.

(८) स्त्रिया व पुरुष ह्या दोघांनाहि आपापल्या आध्यात्मिक दानांचा पूर्ण
विकास करावयासाठी आणि परमेश्वराच्या कृपेचे विश्वस्त होण्यासाठी
आवाहन करण्यात येते, असे बायबल शिकवते. उदा० १ पेत्र ४:१०-११
ही वचने पाहा! येशू ख्रिस्ताच्या शरीररूपि समग्र मंडळीची त्याच्या
अधिकारात सेवा करण्यासाठी स्त्री व पुरुष ह्या दोघांनाहि तो दैवी-
दाने आणि सामर्थ्य देतो. उदा० दाखल पुढील बायबल वचने पाहावीत:-

प्रेषित० १:१४, १८:२६, २१:९; रोम० १६:१-७, १२-१३, १५;
फिलिप्प० ४:२-३. याशिवाय, कलस्सै० ४:१५ व मार्क १५:४०-४१,
१६:१-७, लूक ८:१-३, योहान २०:१७-१८.

(९) नवाकरारातील वरील वचनांशी जुना करार विभागातील
पुढील वचनांची तुलना करा:- शास्ते ४:४-१४, ५:७;
२ इतिहास ३४:२२-२८; नीतिसूत्रे ३१:३०-३१, मलाखी ६:४.

→ ... ४

नवाकराराच्या काळांतील जगीक, व्यावहारिक जीवनात स्त्रिया तसेच पुरुष देखील संदेशकथन-विषयक, याजकीय आणि राजशाही कार्यांची जबाबदारी सांभाळीत असत असे बायबल आपल्याला सांगते. ह्याबाबत पुढील बायबलवचनें ग्वाही देतील: प्रेषित. २:१७-१८; २१:९; १ करिंथ. ११:५; १ पेत्र २:९-१०; प्रकटी. १:६, ५:१०.

बायबलमध्यें अशी कांहीं वचनें आढळतात की तीं स्त्रियांच्या तारणप्राप्तीविषयक स्वातंत्र्यावर निर्बंध आणीत असल्यासारखी दिसतात; अशी एकाकी काही बायबल-वचनें समोर ठेवून इतर परिच्छेदांतील विरोधाभासात्मक वचनांचा अर्थ लावतांना आपण संपूर्ण बायबलच्या शिकवणीच्या आणि एकूण संदर्भाचा विचार लक्षात ठेवणें अत्यंत गरजेची बाब आहे. त्या दृष्टीनें पुढील कांहीं बायबल वचनें वाचून पाहावी:- १ करिंथ. ११:२-१६, १४:३३-३६, १ तिमथी. २:९-१५.

(१०) बायबल आपल्याला हेच शिकविते की, इतर लोकांवर आपला अधिकार गाजविण्यापेक्षा सेवाकार्याकरिता पाठिंबा देऊन, त्यांचे हात बळकट करण्याच्या कामी पुढारीपण करावे. ह्या संबंधी पुढील काही वचनें व परिच्छेद वाचावीत:- मत्तय २०:२५-२८, २३:८; मार्क १०:४२-४५; योहान १३:१३-१७; गलती. ५:१३ आणि १ पेत्र ५:२-३.

## कुटुंब

(११) बायबल आपल्या असें शिकविते की नवरा-बायको आपल्या जीवनांतील दैवी अनुग्रहाचे संयुक्तपणे किंवा जोडीनें वारसदार आहेत; आणि ते परस्पराशी सख्य आणि जबाबदारीच्या नातेसंबंधामुळे एकमेकाशी बांधले गेलेले आहेत. पुढील वचने ह्या संदर्भात वाचावीत:- १ करिंथ. ७:३-५; इफिस. ५:२१; १ पेत्र ३:१-७; उत्पत्ति २१:१२.

नवरा हा कुटुंबाचे 'मस्तक' [Kephale] ह्या नात्यानें त्यानें एकमेकांत सलोख्यापूर्ण नातेसंबंध राखून परस्पराशी निःस्वार्थ प्रेम आणि सेवाव्रत बाळगणें हें पतीचें कार्य आहे, हे नीट लक्षात ठेवावे. पुढील वचने ह्या गोष्टीची पुष्टी करतील: इफिस. ५:२१-३३; कलस्सै. ३:१९; १ पेत्र ३:७.

→ .... ५

(१२) आई व बाप ह्या दोघांनी आपल्या मुलांना शिक्षण देणे, शिस्त लावणे आणि त्यांच्या मनावर योग्य ते संस्कार करण्याच्या कामी दोघांनी पुढाकार घेतला पाहिजे; असे बायबल आपल्याला शिकवते. पुढील काही वचनें ह्या विषयासंबंधात वाचावीत:- निर्गम २०:१२; लेवीय १९:३; अनुवाद ६:६-९, २१:१८-२१, २७:१६; नीतिसूत्रे १:८, ६:२०; इफिस. ६:१-४; कलस्सै. ३:२०; २ तिमथी. १:५ आणि लूक २:५१.

## लागूकरण

### समाज

(१) ख्रिस्ती मंडळींतील स्त्रिया आणि पुरुष ह्यांची आध्यात्मिक कृपादानें ओळखून ती विकसित करणें आणि सेवा व शिक्षण देण्याच्या विविध सेवाकार्यासाठी यांचा उपयोग करणे हे मंडळीचे काम आहे. उदा. गट-प्रमुख, सल्लागार, समन्वयक, व्यवस्थापक, स्वागतकर्ते, प्रभुभोजन देण्यात मदतगार, शिमाय, पास्टरेट समिति सदस्य, गृह-भेटी, शिक्षण, उपदेश देणे व भक्तिचालविणे, आदि विविध पातळ्यांवरील सेवेत सहभाग.

आपल्या सर्व कृपादानांचा दाता जो परमेश्वर ह्याचा ख्रिस्ती मंडळीकडून योग्य तो सन्मान राखला जावा, ह्याकरिता वरील प्रमाणे मंडळीनें आपला कारभार चालवावा. मंडळीतील अध्यात्मिक सभासदांना काहीच जबाबदारी न दिली तर त्यामुळे स्वर्गराज्याच्या कामातील तोटा होतो, म्हणून मंडळीच्या कारभारीपणात सर्वांच्या कृपादानांचा उपयोग करून घेण्यामुळे परमेश्वराच्या आदेशाची पूर्ति मंडळीकडून होईल.

(२) ख्रिस्ती मंडळीतील विविध सेवेच्या आणि पुढारीपणाच्या सेवाकार्यांत सक्रिय भाग घेणाऱ्या पुरुष व स्त्रिया अशा दोघांचा आदर मंडळीनें करावा.

असें केल्यास ख्रिस्ती विश्वासियांच्या स्वभावधर्मदर्शक अशा समाजांतील नमूनेदार ऐक्य आणि सुसंवाद त्या मंडळीत दिसून येईल. भेदाभेद आणि गटबाजीनें ग्रस्त झालेल्या आजच्या जगात केवळ त्यांच्या लिंगामुळे हीनपणाची भावना स्त्रियांच्या मनांत वाढीस लावणाऱ्या एकंदर वातावरणाचा स्पर्शहि ही ख्रिस्ती मंडळी होऊ देणार नाही! ही मंडळी

→ ... ६

आपल्या स्त्रीसभासदांना मंडळी सोडून जाऊ देणार नाही किंवा - ख्रिस्ती विश्वासाकडे पाठ फिरवू देणार नाही.

## कुटुंब

(३) ख्रिस्ती गृहातील नवरा-बायकोने आपल्या वैयक्तिक अशा ज्या आवडीनिवडी आहेत, त्या थोड्या बाजूला ठेवून एकमेकाचे अग्रताक्रम, इच्छा आणि आकांक्षा कशा पूर्ण करता येतील ह्याकडे आवर्जून लक्ष पुरवले पाहिजे. नवरा आणि बायको ह्यांनी एकमेकाशी वरचढपणाने न वागता, दुसऱ्याला स्वतःपेक्षा श्रेष्ठ मानून, नम्रभावने, सेवक असल्यासारखे वागायचे आहे, हे विसरू नये. एखाद्या गोष्टीविषयी निर्णयाप्रत पोहोचणे अशक्य झाल्यास नवरा-बायकोपैकी कोणी एकाने जोडीदारावर आपला निर्णय लादण्याऐवजी आपापसातील विवाद मिटविण्यासाठी बायबलमध्ये सुचविलेल्या पद्धतीचा अवलंब करावा.

असे केल्यास पती-पत्नी पैकी कोणा एकाचीच शक्ति आणि अधिकार ह्यांचा अनुचित वापर होणार नाही आणि ख्रिस्ती गृह खंबीरपणे उभे राहील; नाही तर आपण कुटुंबाचे 'मस्तक' - असल्याच्या पुरुषी हट्टापायी गृहजीवन दुभंगल्यास पत्नीचे अगर बालकाचे शोषण होणे अटळ ठरेल, कारण चूक अर्थ लावण्यामुळे धर्मांध अधिकाराचा विपरित परिणाम ठरलेला आहे.

(४) अनुचित निर्णय घेतल्यास पतिपत्नीपैकी एकाच व्यक्तीला त्याचे विपरित परिणाम भोगावे लागतील हे नीट लक्षात घेऊन ख्रिस्ती-गृहातील जोडप्याने पुढे नमूद केलेल्या आधारावर आपल्या घरातील पुढारीपणाच्या जबाबदाऱ्या वाटून घेण्यास शिकावयाचे आहे :-

- प्रत्येकाला लाभलेली कृपादाने;
- आपले [एखाद्या कामातील] कसब, आणि -
- कौटुंबिक गरजेच्या प्रसंगी कोण मिळू शकेल किंवा हजर असू शकेल, ह्याचा विचार.

असे केल्याने पतिपत्नी आपली योग्यता आणि परस्पराशी - पुरकता ह्या गोष्टींबद्दल आदर बाळगण्यास शिकतील; आणि पोकळ अहंकारामुळे दोघांतील एखाद्याला सदा तोंड सहन करण्याचा प्रसंग येणार नाही. पुष्कळदा एखाद्याच व्यक्तीची आत्मप्रौढीमुळे दंडेलशाही चालू राहते, त्यामुळे ती चूक मार्गाचा अवलंब करीत राहते. असमानतेच्या पायावर →

→ ... ७

(असमानतेच्या पायावर) उभारलेले वैवाहिक जीवन एक दिवस ढासळून विफलतेच्या खोल खड्ड्यात पडू देण्यापेक्षा ख्रिस्ती जोडप्याने आपले कौटुंबिक जीवन भागीदारीच्या तत्वावर उभे करावयाचे आहे.

(५) ख्रिस्ती-गृहातील जोडपी जेव्हा ख्रिस्त येशूमध्ये प्राप्त होणाऱ्या स्वातंत्र्यावर उभारलेल्या जीवनपद्धतीचा अंगीकार करतील तेव्हा त्यांना अपराधी भावनेने ग्रस्त होण्याची अगर ढोंगीपणाचा मुखवटा धारण करण्याची पाळी येणार नाही; कारण ती बायबलने त्याज्य/निषिद्ध मानलेल्या 'रूढीवादा'च्या शृंखला तोडून समानतेच्या पायावर उभे राहावयास मुक्त झालेले खरे ख्रिस्ती लोक आहेत- आणि म्हणूनच परस्परांना जबाबदारपणाच्या ख्रिस्त येशू मधील आनंदाचे वारेकरी आहेत.

अशा प्रकारचे जीवनाचे सूत्र अंगीकारल्यामुळे –

- ते बायबलच्या आज्ञांकितपणाची अगदी उघडपणे घोषणा करतील;
- येशू ख्रिस्तामध्ये प्राप्त होणाऱ्या स्वातंत्र्याच्या शोधात असलेल्या अन्य अनेक जोडप्यांच्या समोर आपल्या जीवनाद्वारे उत्तम नमुना ते ठेवतील; आणि –
- काही वेळा ख्रिस्ती मंडळीवर आणि कुटुंबावर लादल्या जाणाऱ्या असमानतेच्या जीवनपद्धतीच्या आणि दबावाच्या विरोधात उभे राहतील.

जी बायबलवर आधारीत समानता ह्या लेखात सादर करण्यात आलेली आहे ती पवित्र बायबल मधील सत्यावर अधिष्ठित आहे, असा आमचा दृढविश्वास आहे.

समग्र बायबल स्वतंत्रता देणारे देवाचे वचन असून पवित्र – आत्म्याच्या द्वारे देण्यात आलेल्या कृपादानांचा उपयोग आणि देवाची सेवा प्रभावीपणाने करण्यासाठी स्त्रियांना व पुरुषांना संधी उपलब्ध – करून देते, ह्या दृढविश्वासात आम्ही एकोने उभे राहातो.

| | |
|---|---|
| Gilbert Bilezikian | W. Ward Gasque |
| Stanley N. Gundry | Gretchen Gaebelein Hull |
| Catherine Clark Kroeger | Jo Anne Lyon |
| Roger Nicole | |

| | |
|---|---|
| गिलबर्ट बायलेझिकियान | डब्ल्यू. वॉर्ड गॅस्क |
| स्टॅन्ले एन. गुंड्री | ग्रेचेन गेबेलिन हल |
| कॅथरिन क्लार्क क्रोगर | जो ॲनी लायन |
| रॉजर निकोल. | |

→ ....८

© १९८८, ख्रिश्चन्स फॉर बिब्लीकल इक्वालिटी [CBE],
संपूर्ण विधान पुनर्मुद्रित करण्याकरिता CBE-च्या
राष्ट्रीय कार्यालयाकडून परवानगीसाठी पुढील –
पत्त्यावर संपर्क साधावा:-

CBE INTERNATIONAL
CBE International
122 West Franklin Avenue, Suite 610, Minneapolis, MN 55404-2426
Phone: (612) 872-6898 | cbe@cbeinternational.org
www.cbeinternational.org

Name & Address of Marathi Translator:-
INDRASEN DONGRE
Sharada Apartment, 3/II,
426, Rasta Peth,
PUNE-411011 [India]